# व्यक्ती-वल्ली - बहुगुणी मीराताई केळकर

नमस्कार,

ध्यानी मनी नसतांना कांही व्यक्ती रस्त्यात आपल्याला अचानक देवासारखी भेटतात. मुंबईत गेलो असतांना मीराताई केळकर अशाच आम्हाला भेटल्या होत्या. पूर्वी एकाच बिल्डिंगमध्ये रहात असल्याने वीणाची आई आणि त्या जिवलग मैत्रिणी होत्या. गाणं व इतर कला हा समान दुवा होता. वीणाला बघून-भेटून त्यांना खूप आनंद झाला व ती दोघं गप्पांच्या मैफिलीत रंगली होती. मी ऐकण्याचं काम करीत होतो. त्यांच्या संभाषणातून एक सिद्ध झालं होतं की, या मीराताई फार थोर व्यक्ती आहेत आणि उत्तम कलाकारही आहेत. वर म्हटल्याप्रमाणे, देवासारख्याच त्या आम्हाला भेटल्या होत्या. कारण, वीणाला कर्णबधिर मुलांच्या शाळेला तिच्या आईच्या नांवे आर्थिक मदत करायची होती. आणि हा विचार अमेरिकेतून मुंबईत जाण्यापूर्वीच तिने पक्का केला होता. सुदैवाने मीराताईंच्या ओळखीने ते काम सुरळीत पार पडलं होतं. हा दैवी योगयायोग होता. असो.




*१) अचानक झालेल्या भेटीत, वीणा व मीराताई... २) मुलगी माधुरी व मंजुषा यांचेसह मीराताई... ३) वीणा, मीराताई व मी...*

यापूर्वी वीणाने मीराताईंबद्दल मला माहिती दिली होती. परंतु, मीराताईंच्या बोलण्यातून मला अधिक माहिती कळली आणि मी अवाक झालो. त्यांच्याविषयी

दोन शब्द लिहावेत म्हणून मी त्याचक्षणी विचार केला व कांही दिवसांनी आम्ही त्यांच्या घरी गेलो. गप्पांच्या ओघात त्यांच्याविषयी अनेक गोष्टी कळल्या. परोपकारी मीराताई या कलागुणसंपन्न, संगीतज्ञ व अष्टपैलू आहेत. याचा शोध लागला. तंबोऱ्याविषयी मला जे कांही प्रश्न होते त्याचं त्यांनी तंबोऱ्यावरच तारा छेडून माझ्या शंकेचं उत्तमपणे निरसन केलं होतं. मीराताईंचं अफाट कर्तृत्व ऐकून मी थक्कच झालो होतो. एका भेटीत त्यांचं व्यक्तिचित्रण रेखाटणं अशक्य होतं. त्यामुळे मीराताईंनी दिलेली सविस्तर माहिती येथे दिली तर, ते अधिक उचित ठरेल यात शंका नाही...




*१-२-३) मला सुरांची ओळख समजावून सांगतांना संवादिनी व तंबोऱ्यावर मीराताई...*

मीराताईंचं शालेय शिक्षण मनमाड आणि मुंबईत झालं. पुढे रुपारेल कॉलेजमधून इंटर आर्टस पर्यंत शिक्षण झालं. त्यांचे परमपूज्य मातापिता कै. गोपाळ गोविंद भावे कै. कमलाबाई गोपाळ भावे. त्यांचे गुरु होते परमपूज्य कै. राजाराम डोळे गुरुजी. त्यांचं संगीतविशारद पर्यंतचे शिक्षण कै. लक्ष्मणराव बोडस आणि कै. वसंतराव कुळकर्णी यांचेकडून झालं होतं व सुगम संगीताचे शिक्षण कै. भालचंद राव यांचेकडून घेतलं होतं. संस्कृत व मराठी भाषेचे बहुमोल मार्गदर्शन कै. डॉ. सी.ग. देसाई यांचे कडून त्यांना लाभलं होतं. पुढे त्यांनी लिहिलेल्या श्रीगणपती अथर्वशीर्षाचे पद्य रूपांतर स्वरबध्द करून स्वतः मीराताईंनी व त्यांची कन्या मंजूषाने ‘श्री गणेश गीत

मंजुषा' हा अभिनव कार्यक्रम सादर केले होते. याला त्यांचे पती कै. माधव केळकर यांचं प्रोत्साहन व संवादिनीवर नेहमी साथ असे. ते उत्तम संवादिनी वाजवत असत. 'श्री गणेश गीत मंजुषा' हा यशस्वी कार्यक्रम त्यांनी अनेक ठिकाणी सादर केला होता. उदाहरणार्थ बडोदा, मोरगाव, पाली, पुणे, मुंबईत गिरगाव, सिद्धिविनायक देऊळ, ब्राम्हण सहायक संघ, शारदाश्रम दादर, विले पार्ले, बोरिवली, ईत्यादी. विषेष सांगायचे म्हणजे ह्या कार्यक्रमामधलं 'वन्दे गणपतीम' हे संस्कृत गीत सुप्रसिध्द गायिका कै. वीणाताई सहस्रबुद्धे यांनी 'भक्तिमाला' ह्या सीडी मधे गायले आहे. ह्या कार्यक्रमाव्यतिरिक्त इतर वेगवेगळ्या प्रकारची गीतेही त्यांनी स्वरबद्ध केली आहेत. काही संस्कृत श्लोक, रागदारी संगीत, सेमी क्लासिकल, तराणा, अभंग, भक्तिगीते, भावगीते, गवळण, होरी, झूला ईत्यादी होत. ह्यातल्या काही संगीत रचना सुप्रसिध्द गायिका सौ. बकुळताई पंडित, सौ. अर्चना कान्हेरे त्यांच्या कार्यक्रमांमधून सादर करतात. मीराताईंनी संस्कृत, मराठी, हिंदी, कन्नड अशा विविध भाषेतील गीतांना स्वरबद्ध केले आहे. त्यांनी बहूतेक सगळी स्वरबद्ध केलेली भावगीते, भक्तीगीते कै. वंदना विटणकर, शांता शेळके, शांताराम नांदगावकर, सुरेश भट, प्रविण दवणे यांची आहेत. तसेच, संतांचे अभंग, संत मीराबाईची हिंदी भजने, संत कबीर, संत तुलसीदास यांच्या रचनाही त्यांनी स्वरबद्ध केल्या आहेत. यातील काही रचना त्यांच्या मुलीने म्हणजे, मंजू दिवाडकर हिने आकाशवाणी, दूरदर्शनवर गायल्या आहेत. तिच्या युट्यूब चॅनेल ज्याचे नाव आहे 'मंजुषा केळकर दिवाडकर' ह्या चॅनलवर माझ्या काही संगीत रचना तिने गायल्या आहेत. या चॅनलवर मी गायलेले 'वन्दे गणपतीम' आणि 'नमन तुज गणेशा' ह्या दोन ऑडिओ क्लीप्स अपलोड केल्या आहेत. त्या येथे पाहाव्यात.
https://www.youtube.com/results?search_query=manjusha+kelkar+diwadkar



*१) मीराताई त्यांच्या सुरेख निसर्गचित्रासह... २-३-४) मीराताईंच्या भरतकामातील सुंदर कलाकृती...*




*१) सर्व देवदेवतांच्या भक्तीपर रचना आणि प्रार्थना असलेला 'ईशवंदना' काव्यसंग्रह... २) निरनिराळ्या विषयांवरील कवितांचा 'काव्यमाधुरी' काव्यसंग्रह... ३) अमेरिकेचे माजी अध्यक्ष जॉन केनेडीचे पेन्सिलमधील बोलकं रेखाचित्रं... ४) रांगोळीतून रंगविलेलं राजेश खन्ना, शर्मिला टागोर आणि अजित वाडेकर यांची चित्रं...*

याशिवाय, त्या गेली अनेक वर्षे संगीताचे अध्यापन करीत आहेत. शालेय जीवनापासूनच काव्याची व कवितांची आवड असलेल्या मीराताई यांनी अनेक वर्ष लिहीलेल्या काही कविता धार्मिक व काही इतर विषयांवर असून अशा दोन वर्षांपूर्वी त्या पुस्तक रूपात प्रकाशित झाल्या आहेत. तसेच, दोन काव्यसंग्रही प्रकाशित झाले आहेत. याला त्यांच्या मुलीने सहकार्य केलं आहे. एक आहे 'ईशवंदना' - ह्या

काव्यसंग्रहात सगळ्या देवदेवतांच्या भक्तीपर रचना आणि प्रार्थना आहेत. आणि दुसरा आहे ‘काव्यमाधुरी’ - या काव्यसंग्रहात इतर विषयांवरच्या कविता आहेत. उदाः भारतरत्न सचिन तेंडुलकर (सचिनने ते काव्य वाचल्यावर त्वरित त्यावर स्वाक्षरी केली होती), निसर्ग कविता, हास्यकविता, सामाजिक विषय, विडंबन, बालकविता, वगैरे प्रकार यात आहेत. यातील काही कविता साप्ताहिक मासिक ‘लोकप्रभा' मध्ये प्रकाशित झाल्या आहेत. त्याचप्राणे, मीराताईंनी आकाशवाणीवर वनिता मंडळात काही कार्यक्रम सादर केले होते व स्वरचित काव्यरचनाही सादर केल्या होत्या. त्या अभिमानाने म्हणतात, माझी कन्या माधुरी केळकर तसेच, माझी बहीण, भाऊ, माझे जांवई श्री. नितीन दिवाडकर ह्यांचे मला वेळोवेळी सहकार्य लाभले.





*१-३) मीराताईंनी रंगविलेली सुरेख निसर्गचित्रें... २) सौंदर्ययुक्त पेंटिंग...*

मीराताईंचं कर्तृत्व इतकं महान व अफाट आहे की, या व्यतिरिक्त त्यांनी रांगोळीतून कांही व्यक्तिचित्रे रेखाटली आहेत, पेन्सिलने रेखाचित्रें काढण्याची त्यांना आवड आहे. याशिवाय, कल्पक निसर्गचित्रें रंगविणे व भरतकामाचीही त्यांना विशेष आवड आहे. अवघड अशा रांगोळ्यांमधून त्यांनी राजेश खन्ना, शर्मिला टागोर आणि अजित वाडेकर यांचे चित्र रेखाटलं होतं. तसेच, पेन्सिलमध्ये अमेरिकेचे माजी अध्यक्ष जॉन केनेडी यांचे चित्र रेखाटलं होतं. अशा या बहुगुणी मीराताई केळकर यांना उत्तम आरोग्यासह दीर्घायुष्य लाभो अशी मनी सदिच्छा व्यक्त करतो.

आपला,

जयंत.
Jvkny1@gmail.com

*Sharing is Caring…*